www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे


वर्ष : २ | अंक : 273 | वा मंगळवार दि. 17 जून २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

# दृष्य सत्य

## जनतेच्या नजरेतून
### शासनाच्या दरबारात

**माणगाव शहर नगरपंचायत भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून त्यांचे बंदोबस्त करण्यात यावे**





माणगाव प्रतिनिधी दैनिक युवक आधार
संदेश बांदल

माणगाव शहर भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून त्यांचे बंदोबस्त नगरपंचायतीने ठोस करावे आज शाळेची घंटा वाजली आहे लहान मुलं रस्त्यावरून येत जात असेच नगरपंचायती हद्दीमधील उते खोल वाडी भटक्या कुत्र्यांचा वावर जास्त आहे लवकरच लवकर नगरपंचायतीने कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा

# मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न














दैनिक युवक आधार
संतोष आमले
: मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम १५ जून रोजी नवीन पनवेल येथील रोटरी स्कूल हॉल येथे संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात ट्रस्टचे विश्वस्त अजय कापरे यांच्या प्रस्तावनेने झाली. त्यांनी ट्रस्टच्या सामाजिक कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार श्री. बाळाराम पाटील उपस्थित होते. त्यांच्या हस्ते १०० गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी बोलताना बाळाराम पाटील म्हणाले, "विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, चिकाटी व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपले ध्येय गाठावे. अशा सन्मानाने विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळते."

तसेच कार्यक्रमा वेळी नवनाथ साबळे माजी गटशिक्षणाधिकारी यांनी मुलांनी मोबाईलचा योग्य तो वापर करावा आणि आपल्या करिअर साठी त्याचा फायदा करावा असे सूचक माहिती यावेळी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाला भरत जाधव नवी मुंबई महानगरपालिका माजी नगरसेवक, महेश पाटील अध्यक्ष लक्ष्मी पब्लिक स्कूल, जेके कुंभार सर माझी पर्यवक्षक बाठीया स्कूल, सुरेश पाटील माजी मुख्याध्यापक के व्ही कन्या हायस्कूल, विलास फडके माजी जिल्हा परिषद सदस्य पनवेल, प्रकाश म्हात्रे जिल्हाचिटणीस शेकाप, माजी नगरसेविका नीता माळी, अनंत वारे प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पदवीधर सेल, देविदास गायकवाड अध्यक्ष पनवेल प्रेस क्लब, किरण बाथम संपादक डेली टाइम्स 7, पत्रकार सुनील भुजबळ, अण्णासाहेब आहेर आदर्श भारत माझा संपादक,सुरेश भोईर कार्यकारी संपादक दैनिक युवक आधार, विलास गायकवाड उपसंपादक दैनिक युवक आधार, विजय दूंद्रेरेकर कोकण विभाग प्रमुख दैनिक युवक आधार, आदि उपस्थित होते.कार्यक्रम चे सूत्रसंचालन दिग्दर्शक विशाल सावंत यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी बबन बारगजे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या सोहळ्यास ट्रस्टचे अध्यक्ष संतोष शिवदास आमले, सचिव दिलीप कोकाटे, कार्याध्यक्ष बाळासाहेब गोरे, अजय कापरे, प्रशांत गांगर्डे, बबन बारगजे, अशोक घनवट, अण्णा शिंदे, शरद घुले, बाळा झोडगे, बबन खीळदकर, बाळू शेळके, दादासाहेब घालमे, पदाधिकारी, पालक विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व कार्यक्रमाला अल्पउपहार प्रशांत गांगर्डे यांच्या वतीने देण्यात आला कार्यक्रमाचे सुंदर संयोजन मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले होते.



# नवगतांच्या प्रवेशोत्सवाने गजबजल्या शाळा!

## झेंडुच्या फुलांनी सजविलेल्या गाडीतुन विद्यार्थाची मिरवणुक.

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ :**
नव्या शैक्षणिक वर्षाला सोमवारी उत्साहात प्रारंभ झाला. यानिमित्त येरोळ येथील जि.प.प्रशालेच्या विद्यार्थी व शिक्षकांनी नवीन प्रवेश केलेल्या विद्यार्थाची झेंडुची फुले, फुगे लावुन सजविलेल्या जीप मधुन गावात प्रभात फेरी काढली. शाळेत प्रवेश केलेल्या नवागतांचे व त्यांच्या पालकाचे शालेय व्यवस्थापण समिती व जि.प. शाळेतील शिक्षकांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

शाळेच्या पहिल्या विद्यार्थाना दिवशी चॉकलेट व लाडू वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रत्येक विद्यार्थ्यांना पाठ्य-पुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी नवीन प्रवेश घेतलेल्या नवगंताचे व शाळेत त्यांना सोडण्यासाठी आलेल्या आई वडीलांचे मु.अ.राज निचळे, शालेय व्यवस्थापण समितीचे अध्यक्ष तानाजी दाडगे, आमर माडजे पाटील, उपसरपंच सतिस सिंदाळकर, उध्दव वाघमारे, संदिप पाटील, मचिंद्र भालेकर, माजी सरपंच शिवाजी पालकर, व शाळेतील सर्व शिक्षकांच्या हस्ते पुष्पगूच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



# मोदी सरकारचे कार्य जनतेपर्यंत पोहचवा - आमदार प्रशांत ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या आतापर्यंतच्या अकरा वर्षाच्या कालावधीत खूप मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली आहेत. गोरगरिबांसाठी विविध योजनांच्या माध्यमातूनही मोदी सरकारने काम केले. हे काम आपण लोकांपर्यंत पोहचवले पाहिजे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते खारघरमधील रामशेठ ठाकूर कॉलेज येथे आयोजित संकल्प से सिद्धी या कार्यशाळेत बोलत होते.
केंद्र सरकारला अकरा वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने पनवेल विधानसभा




मतदारसंघातील पनवेल तालुका उत्तर मंडळाच्या वतीने संकल्प सिद्धी या कार्यशाळेचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातांमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींना या वेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यशाळेला भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, पनवेल तालुका उत्तर मंडळाचे संपर्कप्रमुख राजेश भगत, अध्यक्ष दिनेश खानावकर, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरिश केणी, पापा पटेल, मन्सूर पटेल, माजी नगरसेविका मंजुळा कातकरी, महिला मोर्चा अध्यक्ष आशा बोरसे, रविकांत म्हात्रे, किरण दाभणे, सरचिटणीस विनोद घरत, अंकुश पाटील, समीर गोंधळी, सचिन वासकर, प्रभाकर जोशी, युवा मोर्चाचे अध्यक्ष आशिष कडू यांच्यासह पदाधिकारी, बूथ अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या अकरा वर्षाच्या कारकिर्दीत अनेक विक्रम प्रस्थापित केले. गोरगरिबांसाठी अनेक योजना राबविल्यामुळे ग्रामीण आणि शहरी गरीब वर्गाचा विश्वास मोदी सरकारने मिळवला. जगाच्या पाठीवर भारताची प्रतिमा उंचावण्याचे कामही त्यांनी केले. आज सक्षम देश म्हणून भारताकडे आता पाहिले जातेय ही आपल्या भारताची ओळख होत चालली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश ताकदीने उभा राहताना जगाला पाहायला मिळाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

# सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत

### अड्याळ येथील ग्रामपंचायत अधिकारी कु पौर्णिमा साखरे यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र ,पुष्पगुच्छ देऊन सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**
**भंडारा-** पवनी तालुक्यातील अड्याळ येथील कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी कुमारी पौर्णिमा जयराम साखरे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस ,दैनिक माझा मराठवाडा विदर्भ विभागीय संपादक, जनता टाइम्स /जटा टीवी चे प्रतिनिधी संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कुमारी पौर्णिमा जयराम साखरे यांना सन्मान चिन्ह, सन्मान प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# सेंट अँन्ड्रयूज गर्ल्स हायस्कूलच्या प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,

**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर**
शैक्षणिक नवीन वर्ष सुरुझाल्याने पुणे कॅम्प येथील सेंट अँन्ड्रयूज गर्ल्स हायस्कूल मध्ये प्रवेशोत्सव उत्साहात साजरा झाला नवीन प्रवेश झालेल्या विद्यार्थिनींना व इतर सर्वच विद्यार्थिनींना संपूर्ण शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आले,
यावेळी शाळेच्या विद्यार्थिनींना शालेय साहित्य वाटप व खाऊ वाटप तसेच शाळेतील सर्व शिक्षकांना गणवेश म्हणून शाळेच्या लोगो सहित ब्लेझर वाटप शिवसेना पुणे शहर संपर्कप्रमुख सुदर्शनाताई त्रिगुणाईत यांच्या हस्ते करण्यात आले होते, यावेळी प्रमुख पाहुणे शिवसेना शिंदे गट शिक्षक शिक्षकेतर पुणे जिल्हा प्रमुख अनिल गडकरी सर, शिवसेना उपशहर प्रमुख विकास भांबुरे, सनी स्पोर्ट चे संचालक जयंत भोसले, शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना साठे, शाळेच्या शिक्षिका मारिया देठे, सीमा कांबळे, मेघा माहीनकर, सुधीर साळुंखे, कसबा विधानसभा प्रमुख, निलेश जगताप, आदि यावेळी उपस्थित होते,



# *गांधी विचार संस्कार परीक्षेत थेपडे म्हसावद विद्यालय जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद साहेब यांच्याकडून सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**
गांधी तीर्थ रिसर्च फाउंडेशन जळगावच्या वतीने आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचे बक्षीस स्वातंत्र्य सैनिक पं.ध.थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद शाळेने पटकावले. थेपडे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पी .डी. चौधरी यांना



माननीय जिल्हाधिकारी साहेब यांनी महात्मा गांधीजींचे स्मृतिचिन्ह भेट देऊन सन्मानित केले. गांधी विचार संस्कार परीक्षेत जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. स्वातंत्र्य सैनिक थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक म्हसावद विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पी डी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली 652 विद्यार्थी विद्यार्थिनीनी या परीक्षेत सहभागी होऊन बक्षिसे मिळवली. सदर परीक्षेत प्रविष्ट विद्यार्थ्यांनी म.गांधीजीचे सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, दयाभाव इत्यादी जीवनमूल्य रुजविणारे विचार आत्मसात केले. गांधी विचार संस्कार परीक्षेचे समन्वयक म्हणून श्री आर. आर. महाजन यांनी काम पाहिले. विद्यालयातील सर्व वर्गशिक्षकांनी या परीक्षेसाठी योगदान दिले. याप्रसंगी माननीय जिल्हाधिकारी आयुष प्रसाद साहेब, डाएटचे प्राचार्य झोपे सर,माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पनाताई चव्हाण, उपशिक्षणाधिकारी रागिनीताई चव्हाण, फिरोज पठाण, राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष जे. के. पाटील, जळगाव तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष खंबायत सर, गांधी विचार संस्कार परीक्षा जळगावचे समन्वयक श्री गिरीश कुलकर्णी, ब.ग.विश्वस्त निधी संस्थेचे चेअरमन डॉक्टर श्री केदारजी थेपडे यांनी मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षक आणि सर्व शिक्षक बंधू भगिनींचे हार्दिक अभिनंदन केले.

# भारती विद्यापीठ आय एम एस आर आणि आय एस टी डी आयोजित कार्यशाळा .

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**
भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च च्या ऑपरेशनस क्लब आणि इंडियन सोसायटी फॉर ट्रैनिंग अँड डेव्हलपमेंट नवी मुंबई आयोजित " डेटा एनालीटिक्स इन ऑपरेशन: मॅनेजमेंट ग्रॅड्यूट क्लासरूम टू रिअल वर्ल्ड इम्पॅक्ट" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा दि. १४ जुन २०२५ आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अंजली कळसे यांनी कार्यक्रमाचे उदघाटन करून ह्या नावीन्यपूर्ण उपक्रमास शुभेच्छा दिल्या. भार्गवी अती, अक्सेंचुअर, मुंबई आणि माजी विद्यार्थी, बीव्हीआयएमएसआर,नवी मुंबई ह्यांनी प्रशिक्षणार्थीना विविध प्रकारच्या डेटा एनालीटिक्स आणि त्याचा उपयोग ऑपरेशनमध्ये कसा करायचा आणि उद्योगाच्या यशात योगदान कसे द्यायचे या विषयावर मार्गदर्शन केले आणि शंकाचे निरसन केले. मुख्य आयोजक डॉ.कुलदीप भालेराव,मुख्य मार्गदर्शक-ऑपरेशनस क्लब आणि सचिव,आय एस टी डी नवी मुंबई ह्यांनी उपक्रम राबवण्यासाठी केलेल्या मार्गदर्शनासाठी भारती विद्यापीठ नवी मुंबई कॉम्प्लेक्सचे संचालक, डॉ. विलासराव कदम,महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अंजली कळसे आणि आय एस टी डी नवी मुंबईच्या अध्यक्षा डॉ.वैशाली



पाटील यांचे आभार व्यक्त केले.एकदिवसीय कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी निकिता शिनेत्रे, यश संखे,विवेक मांडके, नेहा परिमल,कार्तिक घरत,श्रेया वामन,अदिती हिरे, सुमित पाटील ह्या विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले आणि उपक्रम यशस्वी केला.

# महावितरण कंपनीकडून सुरू असलेल्या भोंगळ कारभाराबाबत पेण भाजप आक्रमक झाला असून भाजप युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे

## यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयावर धडक

**दैनिक युवक आधार**
**पेण वार्ताहर**
पेण तालुक्यात विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रकार वाढले असल्याने नागरिक पुरते हैराण झाले आहेत सर्वसामान्य नागरिक तसेच छोट्या मोठ्या व्यवसायांबरोबरच येथील गणपती कारखान्यांना ही याचा चांगलाच फटका बसला आहेतसेच महावितरण कंपनीकडून सुरू असलेल्या भोंगळ कारभाराबाबत पेण भाजप आक्रमक झाला असून भाजप युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी महावितरण कार्यालयावर धडक देऊन अधिकाऱ्यांना भोंगळ कारभाराबाबत जाब विचारत भ्रष्ट



अभियंता सिद्धार्थ खोब्रागडे आणि चेतन पाचपांडे यांना त्वरित निलंबन करण्याचे निवेदन अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांच्याकडे देण्यात आले आहे. तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजना आर डी एस एस सारख्या योजनांमध्ये भ्रष्टकारभार करणारे अभियंते यांचे त्वरित निलंबन झाले नाही तर खासदार धैर्यशील पाटील व आमदार रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निलंबनाबाबत तक्रार करणार असल्याचे भाजप युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे यांनी सांगितले. महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत वारंवार तालुक्यातील वीज पुरवठा खंडित होत आहे तसेच राज्य शासनाने ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे परंतु अभियंत्यांकडून योजनेत भ्रष्टाचार करून योजना केवळ कागदावरच राबवल्याजात असल्याने वेळेवर तालुक्यात मेंटेनन्सची कामे केली गेली नाहीत,जुन्या लाईनी बदलल्या जात नाहीत,पोल बदलले नाहीत,डिपी बदलले नाही यामुळे वीजपुरवठ्याच्या समस्या होत आहेत तरी ही नागरिकांना भरमसाठ वीज बिल देण्यात येत आहेत या इतर समस्ये बाबतची पोलखोल पेण भाजपने करू अधीक्षक अभियंता यांना निलंबना बाबत मागणी केली आहे. यावेळी भाजप युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे,तालुकाध्यक्ष संजय डंगर, डी.बी.पाटील,हरिओम म्हात्रे,परशुराम पाटील,मुरलीधर भोईर,अमित पाटील, विवेक म्हात्रे,गणेश पाटील,प्रशांत पाटील,चंद्रकांत पाटील आदी भाजप पदाधकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऑटिझमग्रस्त झिम्बाब्वेच्या ७ वर्षीय मुलावर भारतात सेल बेस थेरपीने यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**
***नवी मुंबई* वार्ताहर**
: रिजनरेटिव्ह मेडिसिन एक्स्पर्ट आणि स्टेमआरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक डॉ. प्रदीप महाजन यांच्या नेतृत्वाखालील टिमने झिम्बाब्वे येथील ऑटिझमग्रस्त ७ वर्षांच्या शॉन अपुवानाशेवर सेल बेस थेरपीने यशस्वी उपचार करत त्याला नवे आयुष्य मिळवून दिले.
शॉन अपुवानाशेला आयुष्याच्या सुरुवातीलाच विकासात्मक आव्हानांचा सामना करावा लागला. ऑटिझम असलेल्या इतर मुलांप्रमाणेच त्याला देखील स्वतःला व्यक्त करण्यात, सामाजिक संबंध निर्माण करण्यात आणि दैनंदिन क्रियांमध्ये अडचण येत होती. त्याचे पालक खूप चिंतातूर झाले होते. परंतु मुल बरे होण्याची जिद्द न सोडता त्यांनी भारतातील स्टेमआरएक्स हॉस्पिटलविषयी माहिती गोळा केली आणि तिथे नाविन्यपूर्ण उपचार पर्याय अवलंबविण्याचा निर्णय घेतला. *स्टेमआरएक्स हॉस्पिटलचे संस्थापक आणि रिजनरेटिव्ह मेडिसिन एक्स्पर्ट डॉ.



प्रदीप महाजन सांगतात की,* शॉनवर उपचार सुरू झाले तेव्हा त्याच्या विशिष्ट गरजांनुसार रिजनरेटिव्ह उपचारांची मदत घेण्याचा निश्चय केला. यामध्ये स्टेम सेल थेरपी, न्यूरो-रिहॅबिलिटेशन, ऑक्युपेशनल थेरपी, सेन्सरी इंटिग्रेशन, बिहेवियरल थेरपी आणि पोषणविषयक मार्गदर्शन यासारख्या उपचारांचा समावेश होता, ज्याचा उद्देश ऑटिझम असलेल्या मुलांना त्यांची सर्वोत्तम क्षमता साध्य करण्यास मदत करणे हा होता. उपचार सुरू केल्यानंतर लगेचच शॉनने त्यास उत्तम प्रतिसाद दिला. जरी बदल लहान असले तरी ते त्याच्या आणि त्याच्या कुटुंबासाठी खूप अर्थपूर्ण होते. तो अधिक चांगला प्रतिसाद देऊ लागला, लक्ष केंद्रित करु लागला आणि संवाद साधण्याचे नवीन मार्ग शोधण्यास सुरुवात करत होता, ज्यामुळे त्याच्या कुटुंबियांना आनंद आणि आशेचा नवा किरण मिळाला. *डॉ. प्रदीप महाजन पुढे सांगतात की,* आम्ही ऑटिझमवर उपचार करण्यासाठी एक समग्र आणि वैयक्तिकृत दृष्टिकोन प्रदान करतो, ज्यामध्ये विकासात्मक वाढीसाठी आणि जीवनाची एकूण गुणवत्ता सुधारण्यासाठी रिजनरेटिव्ह आणि सहाय्यक उपचारांचा समावेश आहे. या दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी स्टेम सेल थेरपी आहे, जी न्यूरोलॉजिकल कार्य सुरळीत करण्यात मदत करते. स्पीच आणि आक्युप्शनल थेरेपी मुलांना अधिक प्रभावीपणे संवाद साधण्यास आणि स्वतंत्रपणे दैनंदिन क्रिया करण्यास मदत करते. मेंदूचे आरोग्य आणि एकूण कल्याणाकरिता पोषक आहार प्रदान केला जातो. या प्रवासात अधिक कुटुंबांना मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, योग्य उपचार आणि काळजी घेतल्यास, ऑटिझम असलेली मुलं देखील सर्वसामान्य आयुष्य जगु शकतात. *शॉनच्या आईने सांगितले* , जेव्हा आम्ही शॉनला स्टेमरएक्समध्ये आणले तेव्हा आम्हाला काय अपेक्षा करावी हे माहित नव्हते. पण पहिल्या दिवसापासून आम्हाला त्याच्यामध्ये सकारात्मक बदल जाणवले. तो अधिक सतर्क झाला आहे, आम्हाला चांगला प्रतिसाद देत आहे आणि तो कधीही करू शकला नाही अशा गोष्टी करण्याचा प्रयत्न करत आहे हे पाहून खूप आनंद होत आहे. या प्रवासाने आमच्या मुलाची क्षमताच नाही तर आम्ही आमची आशा देखील परत मिळवली आहे. डॉ. महाजन आणि संपूर्ण टीमचे मार्गदर्शन आणि त्यांच्या पाठिंब्यासाठी त्यांचे खुप आभारी आहोत. आता, आम्ही झिम्बाब्वेला परत जाण्यास उत्सुक आहोत आणि शॉन देखील पुन्हा शाळेत जाण्यास आणि त्याच्या मित्रांना भेटण्यासाठी उत्सुक आहे.

# राष्ट्रीय लगोरी फाउंडर्स कप मध्ये बिहार संघाला प्रथम पारितोषिक

### गोवा उपविजयी,तृतीय पारितोषिक महाराष्ट्र व महा. मुंबई

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**
**नाशिक ;-** लगोरी स्पोर्ट क्लब महाराष्ट्र व नाशिक स्पोर्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 18 वर्ष आतील लगोरी स्पोर्ट चॅम्पियनशिप नाशिक येथील विभागीय क्रीडा संकुलात महाराष्ट्र लगोरी असोसिएशनचे अध्यक्ष आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाली या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अनिकेत तटकरे साहेब, ॲड. मनोज कुमार शिंदे सर, किरण पाटील, हेमंत पायर, अभिषेक लाड, सुभाष शिर्के आणि पवन सिंग ,रणधीर सिंग (बिहार), जयवीर डड्डी (हरियाणा), राजेश सर (कर्नाटक), खुशी सिंग (झारखंड), शुभदा सवाईकर मॅडम (अध्यक्ष, गोवा) आणि तनवेश सर (सचिव, गोवा) हे उपस्थित होते. . लगोरी स्पोर्ट क्लबचे संस्थापक अध्यक्ष तुषार जाधव यांनी लगोरी खेळाचे नियम व माहिती विद्यार्थ्यांना सांगितली या स्पर्धेसाठी भारतातून एकूण 18 संघाने सहभाग नोंदवला त्यामध्ये नव्याने सामील झालेले संघ कर्नाटका ,उत्तराखंड, हे संघही उपस्थित होते. लगोरी खेळाचा अंतिम सामना गोवा ,विरुद्ध बिहार यांच्यात झाला बिहार संघाने उत्कृष्ट खेळ करत विजयश्री मिळाला तसेच गोवा संघाला उपविजेयी पदावर समाधान मानावे लागले , तृतीय क्रमांक महा.मुंबई व महाराष्ट्र संघाला मिळाला . मुलींचा




अंतिम सामना हरियाणा विरुद्ध बिहार यांच्यात झाला हरियाणा संघाने उत्कृष्ट खेळ करत विजयश्री मिळवला बिहार संघाला उपविजय पदावर समाधान मानावे लागले तृतीय क्रमांक झारखंड व गोवा यांनी मिळवल्याबद्दल यांचे राज्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लगोरी स्पोर्ट क्लबचे संस्थापक अध्यक्ष तुषार जाधव ,नाशिक संघटक विलास गायकवाड,राजेंद्र पाटील....... यांनी परिश्रम घेतले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## न्हाली ला मिळाले गटारीचे स्वरूप

### शहरात रहदारीच्या रस्त्यावर घाणीचा विळखा

### नगरपरिषद आरोग्य विभाग मात्र निद्रावस्थेत

**दैनिक युवक आधार**
**देवानंद पवार : आर्णी**

शहरातील अनेक ठिकाणी न्हाली मध्ये कचरा साचला असुन पावसाळ्याच्या दिवस सुरू झाले असून, मानवी वस्ती असलेल्या ठिकाणी सुद्धा कचरा साचला आहे, यामध्ये प्रामुख्याने गांधीनगर येथे जाणारा रस्ता जिथे रस्त्याला लागून असलेली न्हाली ज्यामध्ये मोठ्या प्रामणात कचरा दिसून येते. गांधी नगरातील या रस्त्याने मोठ्या प्रमाणात रहदारी होत असल्याने तिथे घाण वास सुटतो, त्या नाली मुले भोवतालच्या घाणीसोबत संहर्ष करावा लागतो अशी प्रतिक्रिया नगरातील लोकांची आहे. अनेक दिवसापासून हा त्रास नसहन करत असल्याचेही सांगितले. मिश्रा यांचे पडीत घराजवळील कवड्या लिंबाचे झाड देत आहे अपघातास निमंत्रण. न. प. मार्फत कार्यवाही ची नागरिकांची मागणी,
नगर परिषद आरोग्य विभागाने याकडे प्रामुख्याने लक्ष्य देण्याची गरज,
कालांतराने आर्णी न.प. प्रशासन हव्या त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याचे त्यांचे जुने इतिहासच...! लक्ष्य देऊन पहले असता आणि मधील अनेक अश्या वस्त्या मध्ये अशाप्रकारची घाण दिसून येईल, ज्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहेत. आणि मध्ये मुख्यतः भारती विद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक शाळेच्या बाजूने भीमनगर कडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात काचऱ्या पासून घाण आहे, अश्या बाबींकडे प्रशासनाने सर्वप्रथम लक्ष्य द्यावे.



## जोगेश्वरीत राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त फळ वाटप कार्यक्रम संपन्न

**- किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष, मराठी अस्मितेचे प्रतीक आणि हजारो युवांचे प्रेरणास्थान सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना (जोगेश्वरी पूर्व) आणि महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेना यांच्या संयुक्त विद्यमाने एक समाजोपयोगी उपक्रम – फळवाटप कार्यक्रम – आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर मनपा रुग्णालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथे पार पडला. या उपक्रमात रुग्ण, त्यांच्या नातेवाईक तसेच रुग्णालय कर्मचाऱ्यांना ताज्या फळांचे वाटप करण्यात आले. राजसाहेबांचा वाढदिवस जल्लोषात न साजरा करता, सामाजिक बांधिलकी



जपत जनसेवेमार्फत साजरा करण्याचा हेतू या उपक्रमामागे होता.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन श्री. जितेंद्र पाटील (जिल्हाध्यक्ष, रायगड व अध्यक्ष – महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेना), श्री. निलेश दूर्वांस खोत (सचिव – मुंबई विभाग), माजी नगरसेवक भालचंद्र अंबुरे (आप्पा), तसेच अनेक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मिळून केले.
या वेळी अनेक मनसे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते, नवनिर्माण सेनेचे युवा सदस्य यावेळी शाखाध्यक्ष श्री. विनोद शिंदे, मनसैनिक श्री. निलेश मांगडे, श्री. प्रकाश टोपले, श्री. प्रवीण बोरकर, श्री. मेहबूब भाई, कु. सोनाली पाटील,गणेश पितळे उपस्थित होते या उपक्रमामुळे
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक रहिवाशांनी आणि रुग्णालय प्रशासनाने मनसे पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

## लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले नवोगतांचे स्वागत!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

नवीन शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश केला असून दरम्यान रायगड जिल्हा परिषद कळंबोली प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत करत सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक व मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक गोपाळ भगत, रविंद्र भगत, विजय खानावकर, राजेंद्र शर्मा, कळंबोली भाजपचे माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, शाळा व्यवस्थापक संस्थेचे अध्यक्ष अनंत भगत व इतर मान्यवर उपस्थित होते.



## राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान मनसे आर्णी तालुक्याच्या वतीने उपक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**आर्णी : देवा पवार**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षाध्यक्ष राज यांचा 14 जून रोजी वाढदिवस होता,
त्या अनुषंगाने मनसे पदाधिकाऱ्यांकडून आर्णी तालुक्यातील स्व. मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रम येथे अन्नदान करण्यात आले,
सामाजिक कार्य बघता तालुक्यातील मनसे प्रथम क्रमांकावर येते, जनसामान्यांसाठी लढा, आंदोलने अशी अनेक प्रकारची सामाजिक कार्ये पक्षाच्या वतीने झालेली आहेत. राजसाहेब ठाकरे यांच्या मते 80% समाजकारण व 20% राजकारण याच संकल्पनेवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना काम करत असते.
तोच ब्रीदवाक्य ध्यानी ठेउन आम्ही काम करीत असतो असे तालुकाध्यक्ष सचिन यलगंधेवार म्हणाले. त्यावेळी शहराध्यक्ष कपिल ठाकरे,संदिप गाडगे,अजय पिकलमूडे,विकास ठमके,धिरज कोडापे,दिपक बोरकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## रक्तदाते युवक हिच राष्ट्राची संपत्ती - शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर):**




राज्यात रक्त न मिळाल्याने अनेकांना जीव गमवावा लागल्याचे पाहिले आहे. मात्र, पनवेल मध्ये अनेक रक्तदाते सामाजिक भान ठेवून कार्यरत आहेत. हे रक्तदाते युवक आपली खरी संपत्ती आहेत,' असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी यांनी केले. कळंबोली येथे रामदास शेवाळे व उपमुख्यमंत्री आरोग्य कक्षाचे प्रमुख मंगेश शेवटी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिर आणि रक्तदाता सन्मान सोहळ्याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. रक्तदान श्रेष्ठ दान' या उक्तीप्रमाणे जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधून शिवसेना पनवेल व रामदास शेवाळे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आणि रक्तदाता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन विशेष कार्यकारी अधिकारी उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय मंगेश चिवटे यांच्या हस्ते आणि रामदास शेवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. कळंबोली सह परिसरातील शेकडो युवकांनी या रक्तदान शिबिरात सक्रिय सहभाग घेतला. आयोजकांच्या वतीने प्रत्येक रक्तदात्याचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. मंगेश चिवटे यांनी रक्तदान आणि दात्यांचा गौरव सोहळा कौतुकास्पद असल्याचे सांगितले. पनवेल शिवसेना व रामदास शेवाळे प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे कौतुक करत महाराष्ट्राच्या निरोगी आरोग्यासाठी उपमुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष अविरत सामाजिक कार्यात सक्रिय राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी कळंबोली शहराध्यक्ष तुकाराम सरक, निलेश दिसले, डीएन मिश्रा, विराट पवार, सुधीर ठोंबरे, सुभाष घाडगे,प्रेम डांगे, आनंदा माने,पंकज सूर्यवंशी, अभिजीत कोरपे, सिद्धेश म्हात्रे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

समाजासाठी, विशेषतः गरजू व आजारी रुग्णांसाठी कार्य करताना आपण दाखवलेला विश्वास माझ्या कार्यास अधिक बळ देणारा आहे. पुढील काळातही जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून वैद्यकीय मदतीचे कार्य अधिक व्यापक व प्रभावी स्वरूपात करत राहण्याचा निर्धार मी व्यक्त करीत आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त उत्स्फूर्तपणे रक्तदान करायला आलेल्या रक्तदात्यांचे आभार.– मंगेश चिवटे विशेष कार्यकारी अधिकारी उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय.

## फुंडे हायस्कूलमध्ये प्रवेशोत्सव साजरा.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

शाळेची घंटा वाजली आणि सुट्टीत रमलेल्या विद्यार्थ्यांची पाऊले शाळेकडे वळली आणि सुरू झाला विद्यार्थ्यांच्या स्वागताचा सोहळा. रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे शनिवार दिनांक १६ जून २०२५ रोजी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.शाळेची घंटा वाजली आणि खऱ्या अर्थाने शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ ची सुरुवात झाली. चिमुकली पावले शाळेकडे येऊ लागली आणि शाळेत आलेल्या या नवागतांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेचे प्रवेशद्वार रांगोळी आणि फुलांनी सजवले होते.जुन्या विद्यार्थ्यांनिनी नऊवारी साडी लावून लेझीमच्या तालावर नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे पुष्पवृष्टी करत, वाजत गाजत स्वागत करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होता. शिक्षणाच्या ओढीने शाळेत प्रवेश घेतलेल्या आमच्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत विद्यालयाचे स्थानिक स्कुल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य साळुंखे बी.बी.सर, उपमुख्याध्यापक सौ. थोरात एस. डी., पर्यवेक्षक सौ.बाबर एस. एम.,सौ पाटील एस. एस., स्कुल कमिटी सदस्य व पागोटे गावचे सरपंच कुणाल पाटील, लेखनिक नवनीत ठाकूर, विद्यार्थी प्रवेश विभाग प्रमुख दर्शना माळी आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या वतीने गुलाब पुष्प आणि पेन देऊन करण्यात आले .
त्याचप्रमाणे सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यालयाचे ग्रंथपाल सौ रुपाली मोकल यांच्या नियोजनाखाली इ पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य साळुंखे बी बी सर,विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू साहेब, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच एन पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे व शाळेचे महत्व सांगितले तर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.



## सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत

### अड्याळ येथील ग्रामपंचायत अधिकारी कु पौर्णिमा साखरे यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र ,पुष्पगुच्छ देऊन सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**



**भंडारा-** पवनी तालुक्यातील अड्याळ येथील कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी कुमारी पौर्णिमा जयराम साखरे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस ,दैनिक माझा मराठवाडा विदर्भ विभागीय संपादक, जनता टाइम्स /जटा टीवी चे प्रतिनिधी संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कुमारी पौर्णिमा जयराम साखरे यांना सन्मान चिन्ह, सन्मान प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

## शासनाच्या चुकीच्या धोरणाविरोधात शेख अब्दुल रहीम यांचे सडेतोड विरोध; सत्य परिस्थितीची चौकशी करून न्याय देण्याची मागणी

### ...त्या 35 शिक्षकांविषयी निलंबनाचे अन्यायकारक आदेश रद्द करा"

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत विविध पंचायत समितीमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या 20 शाळेवरील एकूण 35 शिक्षकांविषयी पटसंख्या कमी करण्यास कारणीभूत ठरल्याचे आरोप करत त्यांना निलंबन करण्याची कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांनी निर्णय घेतला आहे व तसे आदेश सर्व गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणा द्वारे हा अन्यायकारक आणि एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप करत, प्रसिद्ध शिक्षक नेते तसेच हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांनी या



"हा प्रकार शिक्षकांमध्ये भय निर्माण करणारा असून, शासनाने अशा निर्णयांमध्ये पारदर्शकता ठेवावी, अन्यथा शिक्षण व्यवस्था व शिक्षकांचा आत्मसन्मान दोन्ही धोक्यात येतील."
**शेख अब्दुल रहीम**
**संस्थापक अध्यक्ष, हॅपी टू हेल्प फाउंडेशन**
**राज्य प्रवक्ता, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन**

निर्णयाला जोरदार विरोध दर्शवला आहे. त्यांनी आपल्या निवेदनात सांगितले की, या शिक्षकांना ना कसलीही पूर्वसूचना देण्यात आली, ना त्यांची बाजू ऐकून घेतली गेली. त्यामुळे हा निर्णय अन्यायपूर्ण असून तात्काळ मागे घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. शेख अब्दुल रहीम यांनी स्पष्टपणे अधोरेखित केले की, निलंबनासारखी कठोर शिक्षा देताना पुरावे, खुलासा व चौकशी या सर्व प्रक्रिया पार पाडल्या पाहिजेत. मात्र या प्रकरणात कोणतीही सुस्पष्ट चौकशी झाली नाही, हे खेदजनक आहे. ते पुढे म्हणाले, "शिक्षक हे समाज घडविणारे घटक आहेत. त्यांच्यावर अशा पद्धतीने शंका घेऊन, खोट्या आधारावर किंवा अपूर्ण माहितीच्या आधारे निलंबित करणे हे फक्त त्या शिक्षकांवरच नव्हे, तर संपूर्ण शिक्षक समाजावर अन्याय करणारे आहे." त्यांनी मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, शिक्षण आयुक्त, शिक्षण उपसंचालक व सर्व संबंधित यंत्रणेसह शिक्षण विभाग व प्रशासनाकडे सदर कार्यवाही व आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

## खांदा कॉलनीत रिकामा भूखंड बनला कचरा कुंडी

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी**
**राजेंद्र कांबळे**



खांदा कॉलनी परिसरात सेक्टर 9 येथील रिकामा भूखंड सध्या कचराकुंडी बनला असल्याचे दिसत आहे या परिसरातील रोज बाजार मधील अनेक दुकानदार आपला कचरा कचरा कुंडीत न टाकता रिकाम्या भूखंडावर टाकत असलयाचे दिसत आहे पनवेल महापालिका देखील या भूखंडाच्या कचऱ्यावर लक्ष न देत असल्याचे दिसत आहे सिडको चाहा भाग पनवेल महापालिकेच्या नियंत्रणात आल्यानंतर पनवेल माहापालिकेच्या स्वच्छता विभागांनी या परिसरात कचराकुंड च्या घंटागाडी सकाळ संध्याकाळ असे दोन वेळा फिरू लागल्या आहेत तरी देखील रोज बाजार परिसरातील काही दुकानदार आपला कचरा या भूखडावर टाकताना दिसत आहेत त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून रोगराई पसरण्याची भीती आहे पनवेल महापालिकेच्या स्वच्छता विभागाने या परिस्थितीत समस्या कडे लक्ष द्यावे अशी या परिसरातील नागरिकांची मागणी आहे

## मुरबाड विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसंदर्भात आमदार किसन कथोरे यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

दैनिक युवक आधार
गौरव खरे.मुरबाड. शुक्रवार दिनांक 13 जून 2025 रोजी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री आदरणीय ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी आमदार किसन कथोरे साहेब यांच्या मागणी नुसार सह्याद्री अतिथीगृह येथे मुरबाड विधानसभा मतदार संघातील खालील प्रमाणे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी तसेच प्रशासकीय मंजुरी व निधी उपलब्ध करून देणेकरिता आढावा बैठकीचे आयोजन केले होते.सदर बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर बैठकीमध्ये मा. आढावा घेत सर्व अधिकाऱ्यांना आमदार किसन कथोरे साहेबांनी जे प्रकल्प सांगितले आहेत त्या संदर्भात आत्ता पर्यंत काय कार्यवाही केली आहे याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने विषयनिहाय आढावा द्यावा



मग मी त्यावर मार्ग सांगतो असे सुचविले त्यानुसार खालीलप्रमाणे प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या त्यामुळे मुरबाड मतदार संघातील खालील प्रकल्प आता पूर्णत्वास येतील.
कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील बेलवली कात्रप रेल्वे क्रॉसिंग ओव्हर ब्रिज चे कार्यरंभ आदेश देऊन कामाचा शुभारंभ करणे.
कुबनपा हद्दीतील दत्त चौक बेलवली ते समर्थ चौक बॅरेज रोड पर्यंत रेल्वे लाईनला समांतर ओव्हर ब्रिज बांधणे कांजूरमार्ग ऐरोली शिळफाटा कटाई ते बदलापूर मेट्रो प्रकल्पाच्या निविदा काढल्या आहेत परंतु काम लवकर सुरु करणेबाबत.
कुशीवली धरणाचे काम सुरु करणे. मुरबाड तालुका दिवाणी न्यायालयीन नवीन इमारत बांधकाम करणे. उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा काही अटी व शर्थी शिथिल करून नव्याने पूर नियंत्रण रेषा आखणे. मुरबाड तालुक्यातील काळू धरण प्रकल्पग्रस्त शेतक–यांचे पुनर्वसन करून पॅकेज देणेबाबत. जांभूळ उपकेंद्र येथून प्रस्तावित केलेल्या दोन मुख्य उच्चदाब वाहिन्या 220/22 के.व्ही.भूमिगत करणे. बदलापूर शहरास स्वतंत्र्य उपकेंद्र आवश्यक असल्याने प्रस्तावित टाटा पॉवर कंपनीचे उपकेंद्रास जागा उपलब्ध करून देऊन मंजुरी देणे. कुबनपा हद्दीतील स. न. 35/3/2 खाजगी मिळकतीवरील शाळेच्या बांधकामबाबत. इंदगाव, बेंडशील, नंबरवाडी व मामणोली या चार लघु पाटबंधारे प्रकल्पाना MMRDA कडून निधी उपलब्ध करून देणे. बदलापूर सॅटिज प्रकल्प.
बॅरेज रोड ते होप इंडिया रेल्वे ओव्हर ब्रिज ला मंजुरी व निधी देने. मुरबाड विधानसभा मतदार संघातील कुळगाव बदलापूर पूर्व व पश्चिम पोलीस स्टेशनं तसेच टोकावडे, कुळगाव ग्रामीण, टिटवाळा ग्रामीण पोलीस स्टेशनं नवीन इमारत बांधकाम करून कर्मचारी वसाहतिचे बांधकाम करणे. नेवाळी नाका भुयारी बायपास मार्ग मजुरी देणे. क्रीडा संकुल विकसित करणे. नाट्यगृहाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देने. या व इतर अनेक विषयांवर चर्चा होऊन हे प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याबाबत मा. मुख्यमंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

## निकृष्ट कामांबाबत शेकापची पालिकेकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी रस्त्यांची व इतर विकास कामे सुरू आहेत. मात्र यातील काही कामे निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार शेतकरी कामगार पक्षाने पालिकेकडे केली. याबाबत शेकापचे शिष्टमंडळ पालिका अधिकारी संजय कटेकर यांच्याकडे तक्रार घेऊन गेले होते. पनवेल परिसरात अनेक ठिकाणी महानगरपालिकेतर्फे कामे सुरू आहेत. अनेक ठिकाणची कामे संथ गतीने सुरू आहेत. तर काही ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे केली जात असल्याचे शेकापच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. आदई सर्कल जवळील काम देखील संथ गतीने सुरू आहे. कामोठे, कळंबोली, खारघर या ठिकाणची सिमेंट कॉंक्रीट करण्याची कामे रात्रीत उरकून घेतली जात आहेत. त्याला शेकापचा आक्षेप आहे. तसेच ही कामे सुरू असताना पनवेल पालिकेचे अधिकारी उपस्थित नसल्याचा आरोप देखील शेकापच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे जनतेचा पैसा असाच कुठेतरी खर्च केला जात आहे. जनतेचा पैसा असा वाऱ्यावर जाऊ देणार नसल्याचे शेकापने सांगितले. यातील काही निकृष्ट कामे स्वतः थांबवली असल्याचे माजी नगरसेवक प्रमोद भगत यांनी सांगितले. सत्ताधाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे आणि संगनमताने हा सर्व प्रकार सुरू असल्याचा आरोप शेकापच्या माजी नगरसेवकांनी केला. विकासाच्या नावाखाली निकृष्ट कामे जनतेच्या माथी मारली जात आहेत. याकडे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही तर आगामी भूमिका वेगळी असेल असे



यावेळी सांगण्यात आले. यावेळी शेकाप पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे, शेकाप पनवेल महानगरपालिका महिला जिल्हा सहचिटणीस तेजस्विनी घरत, पालिका माजी नगरसेवक प्रमोद भगत, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, माजी नगरसेवक गोपाल भगत, शेकापचे कामोठे कार्याध्यक्ष गौरव पौडवाल, मधुकर सुरते, रमेश गोरे, बंटी पाटील, नंदकिशोर भोईर, समाजसेवक ज्ञानेश्वर गायकर उपस्थित होते.

# को.ए.सो.शाळेने केले चिमुकल्यांचे औषण करून स्वागत

## शाळेचा पहिला दिवस ; कुणी हसू .. तर कोणी रडू ...

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलनातील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या अमरचंद जेठमल जैन प्राथमिक शाळेमध्ये 2025-26 या शैक्षणिक वर्षातील पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या सर्व 35 चिमुकल्या विद्यार्थ्यांचे सोमवार 16 जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी औक्षण करून स्वागत करण्यात आले. यावेळी काही विद्यार्थी रडताना तर काही हसत आंनदी दिसत होती. या सर्व विद्यार्थ्यांचे स्थानिक शाळा कमिटीच्यावतीने शाळा कमिटी चेअरमन अनिल काळे,मुख्याध्यापिका अनघा लोखंडे,कमिटी सदस्य- जयराम पवार,सुभाष जैन, सहा.शिक्षिका राजेश्री शेवाळे, विजया पिंगळे व राहुल भवर यांच्या हस्ते औक्षण,गुलाबपुष्प, चॉकलेट व जिलेबी या खाऊचे वाटप करून स्वागत करण्यात आले. या वेळी काही मुले शाळेत जाणार या खुशीने हसत तर काही मुले आपल्याला आता काही वेळ आई वडील भेटणार नाही या चिंतेत पालकांना बिलगून रडताना दिसत होती. विद्यार्थ्यांचे स्वागत झाल्यानंतर झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते इयत्ता पहिली ते चौथीच्या एकुण साधारण 145 विद्यार्थ्यांना शासना मार्फत पुरविण्यात आलेल्या मोफत पाठ्यपुस्तक देण्यात आली. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्षी पट संख्या वाढल्याचे अनघा लोखंडे यांनी सांगितले असून उपस्थितांचे आभार राजेश्री शेवाळे यांनी मानले. .



# तुषार सपकळ मित्रपरिवाराकडून शाळेतील मुलांना साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सपकळवाडी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सपकळवाडी येथे आज शाळेचा पहिला दिवस म्हणून विद्यार्थ्यांना पुस्तके वह्या पेन्सिल पुष्पगुच्छ खाऊ आणि मुलांचे स्वागत करण्यात आले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सपकळवाडी येथील तुषार सपकळ मित्रपरिवार यांच्या वतीने शाळेतील सर्व मुलांना शाळेच्या पहिल्या दिवशीपुस्तक,वह्या,पेन, पेन्सिल,व खाऊ वाटप करण्यात आला. याप्रसंगी छत्रपती कारखाना संचालिका सुचिता सपकळ उपसरपंच सचिन सपकळ, सारिका पवार,पोलीस पाटील सुनीता सपकळ शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश सपकळ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सोपान तात्या सपकळ,नामदेव नाना सपकळ,सचिन पवार,भुजबळ मॅडम,रेखा मॅडम आदी उपस्थित होते. तुषार सपकळ मित्रपरिवार यांच्यातर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सपकळवाडी येथील शाळेला दरवर्षी मुलांना वही आणि पेन पेन्सिल चे वाटप करण्यात येत आसल्याची माहिती मुख्याध्यापक नाळे सर यांनी दिली.या कार्यक्रमाचे मुख्याध्यापक नाळे सर यांनी प्रस्ताविक केले आणि शाळेच्या उपशिक्षिका सर्जे मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले





स्कूल चले हम :- सिल्लोड तालुक्यातील इरा नेक्सस इंटरनॅशनल स्कूलचे विद्यार्थी शाळेच्या पहिल्या दिवसाच्या स्वागताने भारावले..! विघ्नहर्ता गणपती बाप्पाचे पुजन करून विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत
**( दैनिक युवक आधार योगेश पालोदकर)**

# हिंदू लोहार समाज पनवेल तालुका सामाजिक विकास मंडळ पनवेल ची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

रविवार दिनांक 15 जून 2025 रोजी हिंदू लोहार समाज पनवेल तालुका सामाजिक विकास मंडळ पनवेल ची वार्षिक सर्वसाधारण सभा दुपारी ठीक 3:00 श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल,मार्केट यार्ड येथे ज्येष्ठ समाजबांधव श्री. दत्तात्रेय गजानन मोरे,पनवेल यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाली.* सभेसाठी माजी खासदार लोकनेते श्री.रामशेठ ठाकूर साहेब, मान.आमदार श्री.प्रशांत ठाकूर साहेब, मान.आमदार श्री.विक्रांत पाटील साहेब, माजी. नगराध्यक्ष श्री. जे. एम.म्हात्रे साहेब,माजी विरोधी पक्षनेता श्री.प्रीतमदादा म्हात्रे साहेब, समाजाचे अध्यक्ष श्री.गणेश राऊत साहेब, श्री.आण्णासाहेब जोशी साहेब व इतर अनेक मान्यवर व मोठ्या संख्येने




समाजबांधव उपस्थित होते.*या कार्यक्रमात माजी खासदार लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर साहेबांना मानाचा समाजाला जाणारा लोहार समाजाचा समाज भूषण पुरस्कार देऊन समाजाच्या वतीने गौरविण्यात आले.

त्याचबरोबर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल

१) अँड. श्री.युवराज मुरार जाधव, कल्याण

२) श्री.मंदार रमाकांत मने, पनवेल

३) डॉ. सुरूची संतोष जोशी, वाडा

४) श्री.किरण जयवंत भागवत, कळंबोली

५) श्री.दिलीप वसव लोहार,पुणे

यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच ,गुणवंत विद्यार्थी गुणगौरव,लोहारकाम करणाऱ्या समाजबांधवांचा सन्मान, यावेळी समाजाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी अँड.युवराज जाधव, श्री. आण्णासाहेब जोशी,श्री.सुरेश मांडवगडे श्री.दिलीप वसव, श्री. राजेश सोमवंशी,श्री.गणेशजी राऊत साहेब,श्री. जे. एम. म्हात्रे साहेब,श्री. प्रशांत जी ठाकूर साहेब व माजी खासदार लोकनेते श्री.रामशेठ ठाकूर साहेबांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना समाजाची गरज ओळखून समाज हॉल साठी जागा घेण्यासाठी लोकनेते श्री.रामशेठ ठाकूर साहेब यांनी 25,00,000 रु. व श्री.जे. एम.म्हात्रे साहेबांनी 10,00,000/ रु मदत जाहीर केली. सभेच्या सुरुवातीला प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष श्री.संतोष जाधव यांनी केले. जमाखर्च वाचन श्री.चंद्रकांत भागीवंत यांनी, अहवाल वाचन श्री.शैलेश जगताप,व्हिडिओ शूटिंग श्री.अविनाश मोरे, श्री. शशिकांत दळवी,आभार प्रदर्शन श्री. अजित मोरे व सभेचे सूत्रसंचालन श्री. राजेंद्र पायरे यांनी केले.शेवटी भारत गौरव गीताने सभेची सांगता करणेत आली. *समाजातील एकोप्याचा आणि विकासाचा हा सोहळा सर्वासाठी प्रेरणादायी ठरला

# जलतरण स्पर्धेत जिंतीच्या कु.विराज पाटीलचे यश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही रोटरी क्लब ऑफ कराड यांच्या विद्यमानाने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा २०२५ आयोजित केले होती. या स्पर्धेत सातारा जिल्ह्यातील नामवंत जलतरण पटू यांनी सहभाग घेतला होता. जिंती येथील कुमार युवराज संदीप पाटील यांना लहानपणापासून पोहण्याची आवड असल्यामुळे ते जलतरण करण्यात नेहमी अग्रेसर असायचे. जिंती येथील पाझर तलावामध्ये जलतरण सराव करत असतात. रोटरी क्लब ऑफ कराड यांच्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत कुमार विराज संदीप पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकावून जिंतीमध्ये जलतरण स्पर्धेमधील पहिलाच मानकरी ठरला आहे. त्यामुळे विराज चे कौतुक जिंती ग्रामस्थ व आजूबाजूच्या परिसरांमधून होत आहे.




# बेपत्ता इसम मालेगाव पोलीस प्रशासनाकडून शोध पत्रिका जाहीर.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

**मालेगाव :-** शहरातील इस्तेहार खान गफार खान ऊर्फ राजू (वय ४०) हे दि. १३ जून रोजी सकाळी ८ वाजता नेहमीप्रमाणे मालेगाव येथील वेडिंगच्या दुकानात कामासाठी घरातून बाहेर पडले. मात्र त्यानंतर ते घरी परतलेच नाहीत. त्यांच्या बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांचे भाऊ इमरान खान यांनी पोलीस स्टेशन मालेगाव येथे दिल्यानंतर पोलीसांनी शोध मोहीम सुरू केली आहे. बेपत्ता इस्तेहार खान यांची उंची सुमारे ५ फूट ४ इंच असून शरीरयष्टी सडपातळ आहे. रंग काळासावळा, चेहरा लांबट असून डोळे मध्यम व केस काळे आहेत. त्यांनी हरवण्याच्या दिवशी अंगावर चंदेरी रंगाची अर्धी बाह्यांची टी- शर्ट, व निळी पँट व पायात साध्या चपला परिधान केल्या होत्या. ते हिंदी व मराठी भाषेत संवाद साधतात. त्यांचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. इस्तेहार खान यांचे बेपत्ता होणे हे कुटुंबीयांसाठी अत्यंत



चिंतेचा विषय झाले असून, त्यांचा कुठलाही ठावठिकाणा लागत नसल्याने मालेगाव पोलीसांनी नागरिकांना मदतीचे आवाहन केले आहे. कोणीही त्यांना पाहिले असल्यास तातडीने खालील संपर्क क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन पोलिस निरीक्षकांकडून करण्यात आले आहे.

सदर प्रकाराची नोंद पोलीस स्टेशन मालेगाव येथे मिसिंग क्रमांक ३४/२०२५ अंतर्गत करण्यात आली असून पुढील तपास मालेगाव पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# "राष्ट्रवादी (श.प.) सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदाचे निवड पत्र माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते वसंत (नाना) देशमुख यांना देऊन केला सन्मान"

**दैनिक युवक आधार**
**माळशिरस प्रतिनिधी**
**रघुनाथ देवकर**

:-सोलापूर जिल्हा शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्षपदावर पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवारसाहेब, ज्येष्ठ नेते माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील ,आणि माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांच्या खास मर्जीतील व पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष, पंढरपूर पंचायत समिती व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती वसंत (नाना )देशमुख यांची निवड झाल्याचे पत्र शिवरत्न बंगल्यावरती सर्व मान्यवरांच्या समवेत महाराष्ट्र



राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या पुढील वाटचालीस दादासाहेबांनी शुभेच्छा देऊन पक्ष संघटनेच्या कार्यात वाहून घेऊन नवा विक्रम घडवण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार धैर्यशील भैया मोहिते पाटील यांनी येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका नगरपरिषद व ग्रामपंचायत निवडणुकीच्या संदर्भात आपण गाफील न राहता मोठ्या जिद्दीने आपल्या पक्षाची ध्येयधोरणे गाव पातळीपर्यंत पोहोचवण्याचं काम आपण सर्वांनी केल पाहिजे आणि हे काम आपण माननीय पवार साहेब व आदरणीय मोठे दादासाहेब आणि आपल्या पक्षातील सर्व ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली निश्चितपणाने करणार आहोत याची निश्चितपणाने मला खात्री आहे अशा प्रकारे मत व्यक्त करून पक्षाचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. तर सत्कारमूर्ती व नूतन जिल्हाध्यक्ष वसंत (नाना) देशमुख यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की मी आदरणीय दादासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती जिल्हा परिषद व सहकार क्षेत्रामध्ये त्यांचा एक प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहे. आणि आता माझ्यावरती जिल्ह्याची जबाबदारी दिलेली आहे ती सुद्धा मी आपल्या सर्वांच्या सहकार्याने निश्चितपणे व प्रामाणिकपणाने पार पाडण्याचा प्रयत्न करून आपल्या पक्षाला जिल्ह्यामध्ये निश्चितपणे यश प्राप्त करून दिल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारची ग्वाही दिली. सदर प्रसंगी सांगोल्याचे जेष्ठ नेते बाबुराव गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष रवी पाटील ,पंढरपूर शहराध्यक्ष सुभाष भोसले, विश्वासराव बारबोले, जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष अरुण ( भाऊ) तोडकर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट वजीर शेख, माळशिरस तालुकाध्यक्ष माणिक (बापू) वाघमोडे, जिल्हा महिला आघाडी प्रमुख सुवर्णा शिवपुरे, युती आघाडीच्या विनंती कुलकर्णी, राहुलशेठ शहा तसेच जिल्ह्यातील मोहिते पाटील समर्थक व राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.






दैनिक युवक आधार - आज दिनांक 16 जून 2025 रोजी नवीन पनवेल पूर्व विभागातील श्री संत साईबाबा शाळा येथे शेतकरी कामगार पक्ष यांच्यावतीने शाळेत उपयोगी साहित्याचे वाटप 450 विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलं.. यावेळी उपस्थित श्री शेखर शेळके माजी जिल्हा परिषद सदस्य , तालुका संघटक शेतकरी कामगार पक्ष, नैना विरोधी कमिटी सदस्य व मुख्याधापीका सौ वैशाली पाटिल मैडम उपस्तित होते.या कार्यक्रमाचे आयोजन युवा नेता शे का प श्री सागर महामुनी, पनवेल मार्केट यार्ड संचालक श्री दिनेश महाडिक, श्री सचिन म्हात्रे, श्री राजेंद्र पाटील, कु ऋत्विक म्हात्रे, श्री सचिन महाजन,शिंदे, या व इतर नवीन पनवेल पूर्व विभागातील सर्व कार्यकर्त्यांनी मिळून केले होते*



## पतीने पत्नीवर तलवारीने केला हल्ला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करणाऱ्या पतीने पत्नीवर तलवारीने हल्ला केल्याची घटना उलवे परिसरात घडली. यात महिलेच्या डोक्याला, पायाला दुखापत झाली आहे. उलवे पोलिस ठाण्यात पतीवर गुन्हा दाखल केला आहे. इम्रान खान (वय ३४) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे. याआधी तो मानखुर्द परिसरात राहत होता. काही महिन्यांपासून ते उलवे मध्ये राहण्यास आहेत. इम्रानला दारूचे व्यसन असून तो नेहमी पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करत होता. दरम्यान त्याने पत्नीसोबत झालेल्या भांडणातून तिचे डोके कपाटावर आपटले होते. यामध्ये कपाटाची काच फुटून पत्नीच्या डोक्याला दुखापत झाली होती. त्यानंतर दोघांत पुन्हा भांडण झाले. त्याने घरात ठेवलेल्या तलवारीने तिच्यावर हल्ला केला. यामध्ये तिच्या पायाला दुखापत झाली. पत्नीने अखेर पतीविरोधात पोलिसांकडे तक्रार केली आहे.

## डाळींच्या दरात घसरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
राज्यात सुरू असणाऱ्या अवकाळी पावसामुळे एकीकडे भाज्यांच्या दरात वाढ झाली असून भाज्यांनी शंभरी गाठली आहे. तर दुसरीकडे डाळींच्या दरात घसरण झाल्यामुळे गृहिणींना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. गेल्या काही आठवड्यांपासून डाळींच्या दरात घसरण होत आहे. तूर, चणाडाळ, मूग, मसूर आणि हरभरा यांसारख्या प्रमुख डाळींचे दर ५ ते १५ रुपयांपर्यंत घसरले आहेत. या घसरणीमुळे किरकोळ ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. यंदा डाळींच्या उत्पादनात वाढ झाली आहे. तर यंदा चांगल्या पावसामुळे डाळींचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. उत्पादन वाढल्यामुळे मालाची आवकही बाजारात वाढली आहे. त्यामुळे डाळींच्या दरात घसरण होत आहे.

## नवी मुंबई पोलिसांनी आपल्या अधिकृत वेबसाईटमध्ये केल्या महत्त्वपूर्ण सुधारणा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
पोलीस दलाने तंत्रज्ञानाच्या मदतीने नागरिक सेवा अधिक सुलभ व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलले आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी आपल्या अधिकृत वेबसाईटमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या नव्या वेबसाईटमध्ये अनेक नव्या सुविधा समाविष्ट करून ती अधिक सुरक्षित व यूजर फ्रेंडली बनवण्यात आली आहे. हे बदल नागरिकांच्या वेळेची बचत, कार्यपद्धतीतील पारदर्शकता आणि पोलीस दलाबाबतचा विश्वास वाढवण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे. या नव्या वेबसाईटमुळे नवी मुंबई पोलिसांची प्रतिमा अधिक सकारात्मक होत असून इतर जिल्ह्यांसाठी ते दिशादर्शक ठरत असल्याचे सांगण्यात आले आहे. या नव्या संकेतस्थळांमध्ये उद्योगाशी संबंधित तक्रार करण्याची सुविधा, ई-तक्रार, नोकर नोंदणी फॉर्मची सुविधा, ज्येष्ठ नागरिक नोंदणी फॉर्म, हरवलेले / सापडलेले लेख, पोलिसांबद्दल आलेल्या अनुभवाची प्रतिक्रिया देण्याची सुविधा (फीडबॅक), भाडेकरूंची ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच पोलीस भरती, जनजागृती व कार्यक्रमांची माहिती, इच्छुक उमेदवारांना पोलीस भरती संदर्भातील जाहिराती, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया यांची माहिती वेबसाईटवर मिळणार आहे. तसेच पोलीस विभागाद्वारे राबवण्यात येणाऱ्या जनजागृती मोहिमा व उपक्रमांचा तपशीलही या संकेतस्थाळावर नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. या संकेतस्थळाचे डेटा सेक्युरिटीसाठी सेक्युरिटी ऑडिट करण्यात आले आहे. तसेच भारत सरकारच्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमकडून संकेतस्थळ सुरक्षित असल्याबाबतचे सीईआरटी-इन सिक्युरिटी प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे. नागरिकांना सकतस्थळ हाताळण्यास सुलभ असावे, याकरता चॅटवॉटचा समावेश सकतस्थळावर करण्यात आला आहे. नव्या सुविधांमुळे घरबसल्या पोलीस सेवा मिळत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः आयटी क्षेत्रातील कर्मचारी, गृहिणी आणि विद्यार्थ्यांमधून या अद्ययावत वेबसाईटचे स्वागत करण्यात येत आहे. वेबसाईटचा इंटरफेस आता अधिक आकर्षक, मोबाईल फ्रेंडली आणि बहुभाषिक बनवण्यात आला आहे. इंग्रजीसोबतच मराठी भाषेतही सेवा उपलब्ध असल्यामुळे अधिकाधिक नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली फसवणूक होण्याचे प्रमाण अलिकडच्या काळात वाढले आहे. अनेक लोक 'शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करा आणि जास्त नफा मिळवा' अशा आमिषांना बळी पडतात. फसवणूक करणारे विविध ॲप्स किंवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सद्वारे लोकांपर्यंत पोहोचतात आणि त्यांना खोट्या आश्वासनांनी आकर्षित करून त्यांच्याकडून पैसे उकळतात. अशाच प्रकारे खारघरमध्ये राहणाऱ्या एका ५४ वर्षीय गृहस्थाला शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचे सांगून फसवणूक करण्याचा प्रकार घडला आहे. खारघर से ३० येथे राहणाऱ्या अनिरूध्द कुलकर्णी यांच्याबाबतीत सदरचा हा प्रकार घडला आहे. कुलकर्णी हे राहते घरी असतांना इंस्ट्राग्रामवरील दिव्यांगना थोरात व अपस्टॉक सेक्युरिटीज हे ॲप चालविणाऱ्या विनीता पडोदिया नावाच्या दोन अज्ञात महिलांनी संगनमत करून कुलकर्णी यांना शेअर मार्केट संबंधीत मार्गदर्शनपर मॅसेज पाठवत त्यांचा विश्वास संपादन केला व शेअर मार्केट ट्रेडींग केल्यास तुम्हाला मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवून, कुलकर्णी यांच्या मोबाईल एक लिंक पाठवून त्याआधारे त्यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले व याबाबतचा परतावा न देता फसवणूक केली. याबाबत कुलकर्णी यांनी खारघर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस अधिक तपास करत आहेत.



**दैनिक युवक आधार -** लोणावळा मधील भुशी धरण पूर्ण क्षमतेने भरले लोणावळ्यातील सततच्या मुसळधार पावसामुळे भुशी धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. गेल्या २४ तासात १४३ मिलिटरी पावसाची नोंद झाली आहे. काही पर्यटक स्थळावर 31 ऑगस्ट पर्यंत पर्यटकांसाठी बंदी घालण्यात आली आहे. दरवर्षी पर्यटक भुशी धरणाची भरण्याची वाट पाहत असतात. दरवर्षीच्या मानाने यावर्षी मान्सून पाऊस लवकर चालू झाल्यामुळे धरण पूर्ण क्षमतेने भरून ओसंडून दोन वाहत आहे. त्यामुळे पर्यटकांच्या मध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.

## शाळेचा पहिला दिवस :- सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. मागील दीड-दोन महिन्यांपासून कपाटात विसावलेला गणवेश विद्यार्थ्यांच्या अंगावर चढला.शाळेच्या प्रागणात पहिल्यांदाच पाऊल टाकणाऱ्या चिमुकल्यांनी नव्याकोऱ्या गणवेशाची नवलाई अनुभवली. पुस्तकांचा तो खास गंध श्वास भरून मुलांनी घेतला.सुटीत थोडे दूर गेलेल दप्तर, डबा यांच्याशी नव्याने मैत्री केली. कुणी स्कूल बसने, कुणी पाई, कुणी रिक्षामामां सोबत तर कुणी बाबांच्या गाडीवरून तर कुणी आईचं बोट धरून शाळेत आले. शाळेतही फुगे, फुलांच्या माळा, रांगोळ्या काढून, व मुलांना मोफत पुस्तके वाटप करून मुलांचे स्वागत करण्यात आले.



शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे बहुतांशी पालक आपल्या मुलांना शाळेत पोहोचवण्यासाठी आले होते. याप्रसंगी पाचवीच्या मुलांच्या चेहऱ्यावर भीती होती तर थोड्या मोठ्या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी मात्र, खुप दिवसांनी भेटलेल्या मित्रमैत्रिणींना भेटून गप्पा मारत शाळेचा पहिला दिवस आनंदाने साजरा केला. अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर काकडे यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या व शाळेत नियमित उपस्थित राहून, अभ्यास करण्याचा सल्ला दिला. याप्रसंगी महाविद्यालयाचे शिक्षक दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, संजय चापे, राजेश ठोंबरे, प्रफुल कळम, कृष्णा पाटील, योगेश निंभोरे, सुनील सागरे, गजानन सपकाळ, महादेवी ठवरे, जयश्री चापे, हर्षदा सनांसे, संतुकराव मोरे, अक्षय निकम उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन डॉ रमेश काळे यांनी केले.

## चालत्या एसटी बसचे टायर सुटले! रायगडमध्ये भीषण अपघात टळला, सरकार आणि एसटी महामंडळाचा कारभार जनतेच्या जीवाशी का खेळतोय?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
मुरुड तालुक्यात विहूर गावाजवळ आज दुपारी एक गंभीर प्रकार घडला. बोरिवलीहून मुरुडकडे येणाऱ्या एसटी बसचे (MH 20 BL 3808) उजव्या बाजूचे दोन्ही मागचे टायर धावत्या बसमधून अचानक सुटले, आणि एकच खळबळ उडाली. बसमध्ये अनेक प्रवासी होते. क्षणभरासाठी जीव टांगणीला लागले, पण चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र या घटनेनंतर एसटी महामंडळाच्या बेपर्वा कारभाराचा आणि लोकप्रतिनिधींच्या उदासिनतेचा चव्हाटा पुन्हा एकदा उघड झाला आहे.प्रश्न अनुत्तरित आणि सरकार गप्प का?गंभीर बाब म्हणजे धावत्या गाडीतून टायर सुटणे ही कुठली छोटी घटना नाही, ती मेंटेनन्स, तपासणी आणि सुरक्षेच्या बाबतीत झालेल्या भयानक हलगर्जीपणाची सजीव साक्ष आहे. आज अनर्थ टळला, पण उद्या काय? विद्यार्थ्यांनी भरलेल्या बसमध्ये अशी घटना घडली असती, तर याचे उत्तरदार कोण? एसटी महामंडळ की सत्ताधारी?रायगडात सत्ताधाऱ्यांची त्रिसत्ता, पण जबाबदारी कुणाची नाही! रायगड जिल्ह्यात सत्ताधारी





भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) या तिन्ही पक्षांचे आमदार, खासदार आणि मंत्री आहेत. तरीदेखील सार्वजनिक वाहतुकीकडे होणारे दुर्लक्ष धक्कादायक आहे. बस अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, महाड-दापोली रोडवरील निसरड्या रस्त्यांमुळे नुकतेच एसटी अपघाताचे प्रकार घडले आहेत. आजची घटना त्यावर शिक्कामोर्तब करणारी आहे.दुर्घटना अचानक घडत नाहीत, त्या दुर्लक्षातून घडतात सध्या देशभरात अपघातांची मालिका सुरू आहे. अहमदाबाद विमान अपघात, पुण्याजवळ तळेगावमधील इंद्रायणी नदीतील पूल कोसळणे या घटनाही याच साखळीत. जुने ढासळलेले पूल, तपासणी न झालेली वाहने आणि पायाभूत सुविधांतील कुचराई हीच खरी कारणं आहेत. आता तरी जागे व्हा, सरकार! पावसाळा सुरु झाला आहे. लाखो विद्यार्थी, महिला, कामगार एसटीने प्रवास करतात. जर याच गाड्या जीवघेण्या सापळ्यात बदलल्या, तर त्याला जबाबदार कोण ठरणार? आज अपघात टळला, उद्या तो टळेलच याची हमी कोण देणार? प्रवाशांचा प्रश्न सरकारला आणि एसटी महामंडळाला झणझणीत चपराक आहे "आमच्या जिवाशी खेळायचा अधिकार तुम्हाला कुणी दिला?"

## नोकरीच्या बहाण्याने अडीच लाख रुपयाची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**
पोस्ट ऑफिस आणि इन्कम टॅक्स विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका भामट्याने चक्क एका पोलीस अधिकाऱ्याच्या भावाला अडीच लाख रुपयांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. गणेश वसाराम राठोड असे या भामट्याचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या भामट्याने अशाच पद्धतीने अनेक बेरोजगार तरुणांची फसवणूक केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात फसवणूक झालेला २४ वर्षीय तरुण ऋषी हा कामोठे भागात राहत असून त्याचा मोठा भाऊ पोलीस अधिकारी आहे. २०२४ मध्ये गणेश राठोड हा या पोलीस अधिकाऱ्याच्या संपर्कात आला होता. दरम्यान, त्याने सरकारी नोकरी मिळवून देत असल्याचे या पोलीस अधिकाऱ्याला सांगून त्याने ऋषी याला सरकारी कार्यालयात नोकरीला लावतो, असे सांगत त्याच्याकडून ऑक्टोबर २०२४ मध्ये मूळ शैक्षणिक कागदपत्रे घेतली. त्यानंतर त्याने ऋषी याला सीएसटी येथील जीपीओ कार्यालयात पोस्टल क्लार्क पदाचे बनावट नियुक्तीपत्र देऊन त्याचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर गणेश राठोड याने ऋषी याच्याकडे अडीच लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानुसार, ऋषीने गणेश राठोड याच्या भावाच्या खात्यावर ५० हजार रुपये, तर २ लाख रुपये त्याच्या पत्नीच्या खात्यावर पाठवले होते. त्यानंतर ऋषी हा गणेश राठोड याच्याकडे नोकरीबाबत नेहमी विचारपूस करत होता. मात्र, तो विविध कारणे सांगून टाळाटाळ करत होता. या कालावधीत गणेश राठोड याने तुकाराम कोळी याला देखील नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून देखील त्याने १ लाख रुपये उकळल्याची माहिती ऋषी याला मिळाली. त्यावर एप्रिल २०२५ मध्ये गणेश राठोड याने इन्कम टॅक्स डिपार्टमेंटमध्ये टॅक्स असिस्टंट पदासाठी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून ३० मे २०२५ रोजी ऋषी आणि तुकाराम कोळी या दोघांना चर्चगेट येथील इन्कम टॅक्स कार्यालयात तसेच महालेखापाल कार्यालयात नेले. त्या ठिकाणी बनावट अधिकारी द्वारे त्याच्या कागदपत्रांची तपासणी करण्याचा बहाणा केला. तसेच कामावर रुजू होण्यासाठी मंगळवारची तारीख देऊन दोघांकडून अनुक्रमे अडीच लाख रुपये व ४ लाख रुपये रोख स्वरुपात देण्याची मागणी केली. मात्र, या प्रकरणात गणेश राठोड आपली फसवणूक करत असल्याचे ऋषीच्या लक्षात आल्यावर त्याने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला. त्यानंतर त्याने राठोड याला पैसे परत मागण्यासाठी गत ३ जून रोजी बोलवले असता त्याने वेगवेगळ्या यूपीआय खात्यांवरून ऋषी याला १ लाख रुपये परत पाठवले. मात्र, उर्वरित रक्कम परत केली नाही. या प्रकरणाचा तपास कामोठे पोलीस करत आहेत.

## गळकी झाली शाळा, आता कुठे शिकशील बाळा...

**दीपक गायकवाड/मोखाडा**
तालुक्यात ७ मे रोजी झालेल्या अवकाळी वादळी पावसाने शासकीय मालमत्ता असलेल्या जिल्हा परिषद शाळांची प्रचंड वाताहात केलेली असून जवळपास ७ शाळेवरील पत्र्याचे छप्पर उडून गेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या घटनेला एक महिना पूर्ण झालेला असून सोमवारपासून शाळांची घंटा वाजणार आहे. तरी देखील त्या शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला मुहूर्त मिळाला नसून विद्यार्थ्यांना गळक्या शाळेत बसून धडे गिरवण्याची वेळ आलेली आहे.

- वादळी वाऱ्याने नऊ शाळांचे प्रचंड नुकसान
- ९९ वर्गखोल्या दुरुस्ती आराखड्यात प्रस्तावित



> मागील महिन्यात अवकाळी वादळी पावसाने नुकसान झालेल्या जिल्हा परिषद शाळांची तात्पुरती दुरुस्ती करण्याची सूचना ग्रामपंचायतींना केलेली आहे, तर दोन वर्गखोल्या असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्गखोलीत बसविण्याच्या सूचना शिक्षकांना केल्या आहेत.
>
> वसंत महाले,
> गटशिक्षणाधिकारी,
> पंचायत समिती मोखाडा

### आधी सुविधासंपन्न प्राथमिक शिक्षण द्या!

आजमितीला तालुक्यातील ६० जिल्हा परिषद शाळांमधील ९९ वर्गखोल्या दुरुस्तीसाठी आराखड्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. यात वर्गखोल्या, स्वयंपाकगृह, स्वच्छतागृहाचा समावेश असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. तालुक्यात दरवर्षी प्राथमिक शाळा आणि अंगणवाड्यांच्या दुरुस्तीची मोठी परवड असते. अद्ययावत पायाभूत शिक्षण मिळविण्याचा मूलभूत हक्क असतानाही जिथे शाळेत बसण्याची व्यवस्थाच सुस्थितीत नाही, तिथे शिक्षण विभागाने मारलेल्या अद्ययावत शिक्षणाच्या गमजा अक्षरशः दिशाभूल करणाऱ्या आहेत. त्यामुळे आधी सर्व सुविधायुक्त प्राथमिक शिक्षण पुरविण्याची मागणी पालकवर्ग करत आहेत.

मागील मे महिन्यात तालुकाभरात झालेल्या जोरदार वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाने ठाकुरवाडी, धामणशेत, कुर्लोद, घोसाळी, करोळ, पाचघर येथील जिल्हा परिषद शाळांची वाताहात झालेली असून वादळी वाऱ्यामुळे वीट बांधकाम तुटून पत्रे उडून गेल्याचे चित्र दिसून येत आहे. सुदैवाने अवकाळी पाऊस येण्याची वेळ ही उन्हाळ्यातील सुट्टीची असल्याने जीवितहानी टळली. परंतु सोमवारपासून शाळांची पुन्हा घंटा वाजणार असल्याने विद्यार्थ्यांची वर्गात बसायची अडचण होणार आहे. जोपर्यंत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून शाळा दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नाही, तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा परिषदेच्या शाळांच्या छताची दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही ग्रामपंचायतवर सोपवली असल्याचे शिक्षण विभागाकडून कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे घोसाळी येथील जिल्हा परिषदेची शाळा ही नगरपंचायत हद्दीत येत असल्याने या शाळेच्या दुरुस्तीकरिता नगरपंचायत प्रशासनाला पुढाकार घ्यावा लागणार आहे, अन्यथा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गळक्या वर्गखोलीत बसून धडे गिरवावे लागणार आहेत.

अनावश्यक ठिकाणी संरक्षण भिंत बांधकाम, गटारी बांधकाम अशी एकना अनेक कामे तत्काळ मंजूर करून लाखो रुपये खर्च केले जातात. तिथे देशाची भावी पिढी घडविण्याचे काम ज्या ज्ञानमंदिरामधून केले जाते अशा शाळांची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडे पैसे नाहीत, हे मात्र अनाकलनीय आहे.

## मेट्रो कारशेडसाठी पर्यायी जागांचा विचार व्हावा

### स्थानिक भाजप नेत्याचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**भाईंदर :** भाईंदरच्या डोंगरी येथील डोंगरावर १२ हजार ४०० झाडे व स्थानिकांची घरे तोडण्याऐवजी मेट्रोच्या शेवटच्या स्थानकाजवळील अन्य पर्यायी मोकळ्या जागांचा विचार करावा, असे साकडे स्थानिक भाजप नेते ॲड. रवी व्यास यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घातले आहे. मोकळ्या जागांच्या पर्यायामुळे वाढीव खर्च टळेल, झाडे वाचून पर्यावरणाचे संरक्षण होईल व जनभावनेचा आदर राखला जाईल, अशी भूमिका व्यास यांनी व्यक्त केली आहे.

मेट्रो कारशेडसाठी मौजे डोंगरी येथील सरकारी व खासगी जमीन असलेल्या डोंगरावर जागा निवडली आहे. कारशेडसाठी १२ हजार ४०० झाडे तोडण्याचा प्रस्ताव आहे. स्थानिक ग्रामस्थांसह आदींनी मोठ्या प्रमाणात १२ हजार ४०० झाडे तोडण्यास विरोध करत सुमारे २० हजार नागरिकांनी हरकत घेतली आहे. एमएमआरडीएने मेट्रो मार्गिका ही मुर्धा-राई-मोरवा गावांच्या मागून डीपी रोड विकसित करून मोकळ्या-ओसाड जागेतून जाणार असल्याने मोकळ्या जमिनीवर कारशेड उभारण्याचा पर्याय आहे.



### कामाचा वाढीव खर्च टळेल

सुभाषचंद्र बोस मैदान मेट्रो स्थानकच्या शेजारी मीरारोड पश्चिमेस मीरा इस्टेटची सुमारे ४०० ते ५०० एकर जागा मोकळी ओसाड असून तेथे कारशेड उभारल्यास १२ हजार ४०० झाडे वाचवता येतील, डोंगर फोडणे व सपाटीकरणक टळेल आणि खर्च वाचेल, कोणते घर बाधित होणार नाही, स्थानिक जनतेचा विरोध कमी होईल, वनक्षेत्र बाधित होणार नाही आणि पर्यावरणाचे रक्षण होईल. कामाचा वाढीव खर्च टळेल. मेट्रो स्टेशनपासून कारशेड जवळ असल्याने कायमस्वरूपी खर्च व वेळ वाचून कामकाज सुलभ होईल, असे ॲड. रवी व्यास यांनी निवेदनात म्हटले आहे.

## ट्रॉमा केअर सेंटरचे काम प्रगतिपथावर

**वाडा :** पालघर जिल्ह्यातील मनोर येथील ट्रॉमा केअर सेंटरचे काम प्रगतिपथावर असून सदर ट्रॉमा केअर सेंटरचे काम ९५ % पूर्ण झाले आहे. उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून व यासाठी आवश्यक तो निधी तत्काळ उपलब्ध होण्यासाठी पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या माध्यमातून शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

मनोर येथील ट्रॉमा केअर व नंडोरे पालघर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी लवकरच उर्वरित निधी लवकरच प्राप्त होऊन सदरची रुग्णालये रुग्णांच्या सेवेसाठी लवकरच उपलब्ध होतील, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केला आहे.

## इराण-इस्त्रायल संघर्ष, कच्च्या तेलाच्या दरावर आठवड्यात गुंतवणूकदारांचे लक्ष

### अमेरिकेचा व्याजदर निर्णयही महत्त्वाचा : विश्लेषक

**नवी दिल्ली :** या आठवड्यात पुढील संकेतांसाठी शेअर गुंतवणूकदार इराण आणि इस्त्रायलमधील सुरू असलेला संघर्ष, ब्रेंट कच्च्या तेलाच्या किमती, महागाईची आकडेवारी आणि यूएस फेडरल व्याजदराचा निर्णय यावर लक्ष ठेवतील, असे विश्लेषकांनी सांगितले. टॅरिफशी संबंधित बातम्या देखील शेअर बाजारावर प्रभाव पाडतील, असे तज्ज्ञांनी नमूद केले.

गेल्या आठवड्यात शेअर बाजारांमध्ये अस्थिरतेचा उच्चांक होता आणि वाढत्या भू-राजकीय तणावामुळे जोखीम निर्माण झाली. तेलाच्या वाढत्या किमतींमुळे गुंतवणूकदारांच्या भावनांना मोठा फटका बसला कारण पुरवठा विस्कळीत होण्याची भीती पुन्हा निर्माण झाली.

इस्त्रायल-इराण संघर्षादरम्यान मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे भारतीय शेअर बाजार जागतिक ट्रेंडचे अनुसरण करण्याची शक्यता आहे. ज्यामुळे निराशावाद आणखी वाढू शकतो आणि गुंतवणूकदारांना धोकादायक जादा मूल्याच्या समभागांची विक्री करण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते. तसेच, बुधवारी यूएस फेडरल रिझर्व्ह व्याजदर निर्णयापूर्वी व्यापारी सावधगिरी बाळगतील. तसेच जपान आणि यूकेच्या इतर मध्यवर्ती बँका त्यांचे व्याजदर स्वतंत्रपणे जाहीर करतील, असे वित्तीय सेवा प्रदाता अल्मंड्झ इन्स्टिट्यूशनल इक्विटीजचे विक्री प्रमुख केतन विकम यांनी सांगितले.

बाजार जागतिक समभागांमधील ट्रेंड आणि रुपयातील हालचालींवर देखील लक्ष ठेवतील, असे विश्लेषकांनी सांगितले. एकूणच, कमकुवत जागतिक संकेतांमुळे बाजार मंदावलेला राहील, अशी आमची अपेक्षा आहे, तर उद्योग-विशिष्ट बातम्यांचा प्रवाह क्षेत्रीय हालचालींना चालना देत राहील, असे मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे संशोधन, संपत्ती व्यवस्थापन प्रमुख सिद्धार्थ खेमका म्हणाले.



### आघाडीच्या आठ कंपन्यांच्या बाजारमूल्यात १.६५ लाख कोटींनी घट

**नवी दिल्ली :** गेल्या आठवड्यात आघाडीच्या १० कंपन्यांपैकी आठ कंपन्यांचे एकत्रित बाजारमूल्य १,६५,५०१.४९ कोटी रुपयांनी घसरले. देशांतर्गत शेअर बाजारातील घसरणीच्या अनुषंगाने एचडीएफसी बँकेला सर्वात जास्त फटका बसला. गेल्या आठवड्यात, बीएसई सेन्सेक्स १,०७०.३९ अंकांनी किंवा १.३० टक्क्यांनी घसरला आणि निफ्टी २८४.४५ अंकांनी किंवा १.१३ टक्क्यांनी घसरला.

## ओएनजीसीच्या तेलविहिरीत गॅस गळतीमुळे ७० कुटुंबे स्थलांतरित

**शिवसागर :** ऊर्जा क्षेत्रातील प्रमुख ओएनजीसीच्या आसाममधील शिवसागर जिल्ह्यातील विहिरीत चौथ्या दिवशीही गॅस गळती सुरूच आहे, जिथे ७० कुटुंबांना मदत छावणीत हलवण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले.



ओएनजीसीचे संचालक (तंत्रज्ञान आणि क्षेत्र सेवा) विक्रम सक्सेना यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शनिवारी गॅस गवळती झालेल्या विहीर क्रमांक आरडीएस १४७ चे नियंत्रण ताब्यात घेतले, असे त्यांनी सांगितले. विहीर बुडवण्याची प्रक्रिया सुरू आहे आणि त्यासाठी आम्ही सर्व आवश्यक उपकरणे एकत्रित केली आहेत. गळती नियंत्रित करण्यासाठी क्रायसिस मॅनेजमेंट टीम (सीएमटी) युद्धपातळीवर काम करत आहे, असे एका अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले.

विहिरीला अद्याप आग लागलेली नाही आणि या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही, असे त्यांनी सांगितले.